महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य गोर बंजारा साहित्य अकादमी
दूरध्वनी :०२२-२२६७२५३९
ई-मेल :mhsahityaacademy@gmail.com
ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, दुसरा मजला,
शहिद भगतसिंह मार्ग, मुंबई - ४०० ००१.

## गोर बंजारा साहित्य अकादमीची उद्दिष्टे -

- राज्यातील बहुभषिकांच्या म्हणजेच मराठी भाषिकांच्या संस्कृती, साहित्य, भाषा व लोकजीवनाशी सुसंवाद साधून सांस्कृतिक सुसंवाद निर्माण करण्याची कला या भाषिक अल्पसंख्यांकांना अवगत व्हावी.
- गोर बंजारा, भाषा, साहित्य, कला व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करणे.
- गोर बंजारा भाषा, साहित्य आणि कला क्षेत्रातील व्यक्तींना पुरस्कृत करणे.
- गोर बंजारा भाषेच्या विकास व संवर्धनासाठी प्रोत्साहन देणे.
- गोर बंजारा भाषेतील वाड्.मयीन कृती प्रकाशित करण्यास सहाय्य करणे.
- मराठी आणि गोर बंजारा या भाषांमध्ये साहित्यिक कल्पनांची देवाणघेवाण करणे.
- गोर बंजारा अशा भाषिक अल्पसंख्याकांनी केवळ त्यांच्या भाषेतील कार्यक्रम आयोजित करुन मर्यादीत सामाजिक सुसंवाद ठेवण्याऐवजी त्यांच्या भाषेतील कार्यक्रमांसोबतच मराठी भाषिक कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यामध्ये मराठी भाषिकांनाही सहभागी करुन सामाजिक सुसंवाद निर्माण करणे.
- गोर बंजारा या भाषेसोबतच मराठी भाषेतही परीसंवाद,चचासत्रे, कविसंमेलने यासारखे साहित्यिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.
- गोर बंजारा सोबतच मराठी भाषिकांच्या लोककलांची संमेलने आयोजित करणे.

************